पिंजऱ्यातली पाखरे

लेखक - फ्रेडरिक लिप

चित्रे - रोनाल्ड हिम्लर

मराठी अनुवाद - सानिया

पिंजऱ्यातली पाखरे

कम्बोडियातील नोम-पेन्ह शहराबाहेरच्या उबदार सोनेरी हवेत पक्षी भरारी घेतात. हिरव्यागार शेतांवर, झाडांवर बागडतात. स्वच्छंदी आकाशात घिरट्या घालतात. अरीला मात्र या पाखरांबद्दल आणि स्वच्छ सोनेरी हवेबद्दल काहीच माहीत नाही. ती राहते तिथली हवा प्रचंड प्रदूषित आहे. आणि पक्षी तर तिने फक्त पिंजऱ्यातच पाहिलेत. अन्न आणि पाण्यासाठी मालकिणीवर अवलंबून असलेले, जन्मजात स्वातंत्र्याला मुकलेले प्रशिक्षित बंदिस्त पक्षी.

अरीला स्वतःचं आयुष्यही पिंजऱ्यातल्या पाखरांसारखं बंदिस्त वाटत राहतं. ती खूप गरीब आहे. आपल्या कुटुंबासाठी तिच्या खूप इच्छा आकांक्षा आहेत. अरीचं एक स्वप्न आहे. पिंजऱ्यावाल्या म्हातारीकडून तिला एक पक्षी घ्यायचाय आणि त्याला मुक्त करायचंय. पाखरू निळ्याशार आकाशात झेप घेईल आणि अरीच्या साऱ्या इच्छा पुऱ्या होतील. पूर्वापार चालत आलेल्या या प्रथेवर अरीचा गाढ विश्वास आहे.

आपल्या इच्छांना सोनेरी हवेवर स्वार होऊ देण्यासाठी अरीला ज्ञान आणि शक्ती पणाला लावावी लागेल. या बळावरच कदाचित कधीतरी ती आणि तिचं कुटुंब गरीबीचे जोखड तोडून स्वच्छंद भरारी घेऊ शकेल.

पिंजऱ्यातली पाखरे

लेखक - फ्रेडरिक लिप
चित्रे - रोनाल्ड हिम्लर
मराठी अनुवाद - सानिया

नोम-पेन्ह शहराबाहेरच्या हिरव्यागार भात शेतांवरून वाऱ्याची सोनेरी झुळूक हलकेच वाहते. स्वच्छ सूर्यप्रकाश आणि अधूनमधून येणाऱ्या पावसाच्या सरींमुळे कम्बोडियातली हवा सोन्यासारखी पिवळी भासते. ही हवा गावात समृद्धी आणि मुलांसाठी पोटभर भात आणते.

अरीने आपलं आठ वर्षांचं आयुष्य शहरातल्या गजबजलेल्या रस्त्यांवर घालवलं होतं. खारवलेले मासे आणि भात हेच तिचं रोजचं जेवण होतं. पण हा भात जिथे पिकतो ती शेतं मात्र तिने कधीच पाहिली नव्हती. अरीच्या ओळखीचे व्यापारी तिला शहराबाहेरच्या हिरव्या दुनियेच्या गोष्टी सांगायचे. त्यांनी तिला रानातल्या पक्ष्यांबद्दल सांगितलं होतं. निळ्या आकाशात उडणाऱ्या हजारो पतंगांसारखे रंगीबेरंगी, स्वच्छंदी पक्षी!

शेतांवरून येणारी उबदार हवा नोम-पेन्ह शहरात पोहचेपर्यंत त्यात कोळशाची राख आणि मोटारसायकलीतून निघणारा धूर मिसळला जायचा. सोनेरी हवा काळवंडून जायची. ह्या करड्या, जड हवेत श्वास अगदी कोंडून जायचा.



उन्हाळ्यातल्या एका दिवशी अरी लवकर उठली. तिने चटईखाली हात घातला आणि तिथले तीनशे रील्स(कंबोडियातील चलन) बाहेर काढले. शहराला भेट देण्याऱ्या पर्यटकांना फुलांचे गुच्छ विकून तिने ते पैसे कमावले होते. अरीचे तीन भाऊ आणि दोन मोठ्या बहिणी आई बाबांसोबत जमिनीवर झोपल्या होत्या. अरीने दार उघडलं आणि ती मांजरपावलांनी बाहेर निसटली. ‘वॅट नोम पेन्ह’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहराच्या जुन्या भागाच्या दिशेने ती चालू लागली. तिथे बुद्ध विहाराच्या आजूबाजूला व्यापारी दुकानातील वस्तूंची मांडामांड करत होते. चकचकीत हॉटेलांमध्ये आणि विश्रामगृहांमध्ये पर्यटक सकाळचा नाश्ता करत होते.

पक्ष्यांचा पिंजरा घेऊन बसलेली म्हातारी अरीला पाहून धूर्तपणे हसली.

"काय गं पोरी, इतक्या सकाळी सकाळी इथे काय करते आहेस? आज काय आणलं आहेस विकायला?"

"आज मी काही विकायला नाही तर विकत घ्यायला आले आहे." अरी म्हणाली. "मला पिंजऱ्यातला एक पक्षी हवा आहे. त्याला मी मोकळं सोडेन आणि मग माझ्या कुटुंबासाठीच्या माझ्या साऱ्या इच्छा पूर्ण होतील."

"खूप जुनी प्रथा आहे ही." म्हातारी म्हणाली. "पण मुली, अशी स्वप्नं फक्त श्रीमंत लोकांनाच परवडतात. तुझ्याकडे काही पैसे असतील असं वाटत नाही. चल, पळ पाहू घरी."

म्हातारीने पिंजरा पुढे झुकवला. पिंजऱ्यातले शंभर एक पक्षी दाणे टिपू लागले. छोट्याशा वाडग्यातून पाणी पिऊ लागले. पिंजऱ्याच्या आत लावलेल्या बांबूच्या काठ्यांवर झोके घेऊ लागले. उबदार सोनेरी वाऱ्यापासून खूप दूर असलेल्या या गजबजलेल्या छोट्या पिंजऱ्यात पक्षी गाऊ लागले. अरीने त्या बंदिस्त पाखरांकडे पाहिलं. पक्ष्यांच्या चिवचिवाटाला उदासीनतेची झाक होती. तीच उदासीनता जी अरीला तिच्या आयुष्यात रोज जाणवत राहायची.

“मी तीनशे रील्स जमा केले आहेत.” अरी म्हणाली.

तिने पैसे म्हातारीच्या हातावर ठेवले. म्हातारीने नाणी निरखून पारखून व्यवस्थित मोजली.

“चल पोरी, निवड तुझं पाखरू आणि सांग त्याला तुझी इच्छा.”

अरीने पिंजऱ्याच्या छोट्याशा दारातून हात आत घातला. तिच्या हालचालीला घाबरून आधीच गिचमिडीत बसलेले पक्षी अजूनच एकमेकांना चिकटले.

कोपऱ्यातल्या छोट्याशा पक्ष्याला अरीने अलगद पकडलं. पाखरू बिथरलं. त्याच्या चिमुकल्या हृदयाचे ठोके अरीला जाणवले.

“चल पटकन, बोल तुझी इच्छा आणि सोडून दे त्याला.” म्हातारीने अरीला दटावलं. “असंच धरून बसलीस तर भीतीने जीव जाईल त्या बिचाऱ्या पाखराचा!”

अरीच्या मनातल्या सगळ्या इच्छा आकांक्षा तिच्या डोळ्यासमोरून तरळून गेल्या. तिच्या हातातला पक्षी चुळबुळ करत होता. अरीने हात उंचावला आणि पाखराला सोडून दिलं.

घरांची छपरं आणि झाडांचे शेंडे मागे टाकत पाखराने हवेत भरारी घेतली. पक्षी मुक्तपणे उडताना बघून अरी सुखावली. आकाशात गोल घिरट्या घालत पाखरू दमट हवेवर स्वार झालं.

“जा पाखरा. माझ्या इच्छांना पंखांवर घेऊन दूर उडून जा.” अरी स्वतःशीच कुजबुजली.

अरी हसू लागली. ती आज प्रचंड खुश होती. या आनंदाच्या क्षणासाठी तीनशे रील्स म्हणजे अगदीच क्षुल्लक किंमत होती.



म्हातारी मात्र गप्प होती. बसल्या बसल्या मांड्यांची चुळबुळ करत ती कसलीतरी वाट बघत होती.

आणि मग एक घटना घडली. जी याआधीही किमान हजार वेळा घडली होती. उडता उडता पाखराने मार्ग बदलला आणि ते म्हातारीच्या दिशेने निमुटपणे खाली येऊ लागलं. झाडाचं पिकलं पान हळुवारपणे जमिनीवर पडतं तसं.

“नाही!” अरी किंचाळली. “पाखरा जा! सोनेरी हवेच्या उबदार प्रदेशात जा.”

पाखरू म्हातारीच्या बोटावर उतरलं. म्हातारीने पिंजऱ्याचं दार उघडल्यासरशी टुणकन उडी मारून ते बांबूच्या काठीवर जाऊन बसलं. इतर पक्ष्यांच्या सुरात सूर मिसळून पाखरू गाऊ लागलं. मोठ्याने चिवचिवु लागलं. इतर पक्ष्यांच्या गर्दीत असूनही अरीला पाखरू अगदी एकाकी भासलं.

म्हातारीने मांड्यांची चुळबुळ केली आणि ती इतर गिऱ्हाईकांची वाट बघू लागली.

अरीला कळून चुकलं की तिच्या इच्छा पुऱ्या होणार नाहीत. ज्या पक्ष्याला स्वतंत्रपणे उडणं ठाऊक नाही तो इच्छांना पुर्तीकडे कधीच नेऊ शकणार नाही. पाखराला पिंजऱ्यात मुबलक अन्न आणि पाणी होतं. ह्या लोखंडी तुरुंगालाच त्याने आता आपलं घर मानलं होतं.

अरी रडू लागली.

रडत रडत ती घराच्या दिशेने धावू लागली. घराच्या दारातून ती आत शिरली तेव्हा तिचं कुटुंब अजूनही गाढ झोपेत होतं. हा आहे आपला पिंजरा, चटईवर डोकं टेकवून अरी विचार करू लागली. म्हातारीने मला फसवलं. इथे काहीच बदलत नाही. तेच खारवलेले मासे आणि भात. तेच ठिगळं लावलेले कपडे. त्याच सतत डोक्याभोवती घोंघावणाऱ्या माश्या... मला पंख असते तर किती बरं झालं असतं. मी पंख पसरून कुठेतरी लांब उडून गेले असते.

“अगदी कुठेही!” अरी मोठ्याने म्हणाली.

आपला मोठा आवाज ऐकून अरीला स्वतःलाच खूप आश्चर्य वाटलं. तिची भावंडंही दचकून जागी झाली. अरीचा सर्वात धाकटा भाऊ, सेरी, डोळे चोळत उठला. ‘सेरी’ ह्या नावाचा अर्थ आहे ‘स्वतंत्र’.

“काय झालं अरी?” त्याने विचारलं.

निराश झालेल्या अरीने काहीच उत्तर दिलं नाही.

सेरी चटईपाशी गेला आणि त्याने अरीच्या खांद्यांना हळूच स्पर्श केला. दोघे दाराबाहेरच्या प्रखर सूर्यप्रकाशाकडे टक लावून पाहत बसले.

नोम पेन्ह शहराच्या गजबजलेल्या रस्त्यांवरची ही आणखी एक सकाळ.

दिवसांमागून दिवस गेले. अरीने आशा सोडली नाही. आपल्या कुटुंबाची परिस्थिती सुधारण्याचे तिचे प्रयत्न चालूच होते.

एके दिवशी मेकोंग नदीकाठी फुलांचे गजरे विकून झाल्यावर अरी आपल्या आजोबांकडे गेली. तिने आजोबांना विचारलं, “आजोबा, एखादा माणूस एका वेळी जास्तीत जास्त किती इच्छा मागू शकतो?”

आजोबांनी थोडा विचार केला.

“एका श्वासात जितक्या मागता येतील तितक्या इच्छा तू मागू शकतेस. एक मोठा श्वास घे. आणि मग तो हळूहळू सोडून दे. तुझ्या साऱ्या इच्छांना त्या एका श्वासावर स्वार होऊ दे.”

अरीला तिच्या कुटुंबासाठी इतकं काही मागायचं होतं की ते एका श्वासात मावणं कसं शक्य आहे असं तिला वाटलं.

“अरी बाळा, आणखी एक गोष्ट लक्षात ठेव. आपल्या इच्छांची उत्तरं आपल्याला हवी तशीच असतील असं नाही. बऱ्याचदा ती अनपेक्षित असतात.”

“आजोबा, पिंजऱ्यातल्या पक्ष्याला मुक्त केलं तर आपल्या साऱ्या इच्छा पूर्ण होतात हे खरं आहे ना?”

“हो तर. पण त्यासाठी तसं नशीबवान पाखरू मिळालं पाहिजे.”

“नशीबवान पाखरू! पण शंभर पक्ष्यांच्या पिंजऱ्यातून असं नशीबवान पाखरू निवडणं कसं शक्य आहे?”

आजोबा हसले. “अरी बाळा, तुझ्या नावाचा अर्थ होतो, ‘ज्ञान’. एवढं कायम लक्षात असू दे.” यानंतर ते एकही शब्द बोलले नाहीत.



रोज दिवस संपला की अरी तिच्या दिवसभरच्या कमाईतील काही नाणी स्वतःजवळ ठेवायची आणि बाकी पैसे बाबांकडे सोपवायची. मोकळा वेळ मिळाला की ती पिंजऱ्यातल्या पक्ष्याचं निरीक्षण करायला जाई.

सुरुवातीला अरीला सगळे पक्षी सारखेच वाटत. पण हळूहळू जसजशी ती निरीक्षण करत गेली तसतसे तिला बारकावे समजत गेले. प्रत्येक पाखराचा वेगळा स्वभाव होता. काही पक्षी लाजरे-बुजरे होते तर काही अति आगाऊ होते. ते इतरांवर दादागिरी करायचे. अरीला आजोबांचे शब्द आठवले, “स्वप्न पूर्ण करायचं सामर्थ्य पंखात असलेला नशीबवान पक्षी इतरांपेक्षा वेगळा असतो.”

एके दिवशी अरीने म्हातारीला एक नवीन पक्षी पिंजऱ्यात ठेवताना पाहिलं. घाबरलेलं पाखरू पिंजऱ्याच्या कोपऱ्यात जाऊन बसलं. त्याने दाणे टिपले नाहीत. पाण्याला तोंडही लावलं नाही. इतर पक्ष्यांच्या विस्मृतीत गेलेलं एक गुपित पाखराच्या मनात अजूनही जिवंत होतं.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे अरी झोपेतून उठली आणि मंदिराच्या पायऱ्यापाशी गेली. शंभर पक्ष्यांचा पिंजरा घेऊन बसलेली म्हातारी गिऱ्हाईकांची वाट बघत होती.

"आज मी आणखी एक पक्षी विकत घेण्यासाठी आले आहे." अरी म्हातारीला म्हणाली.

"ए पोरी, पळ पाहू घरी! इतके दिवस तू माझ्या पाखरांवर नजर ठेवून होतीस हे मला चांगलंच ठाऊक आहे." म्हातारी खेकसली.

"पण माझ्याकडे पैसे आहेत. त्या कोपऱ्यातल्या पक्ष्यासाठी मी चारशे रील्स आणले आहेत." अरी म्हणाली.

"ते कोपऱ्यातलं पाखरू सोडून इतर कोणताही पक्षी घे." म्हातारी म्हणाली.

म्हातारीच्या लबाडीची आता अरीला चांगलीच खात्री पटली होती. तिने हात झटकले आणि मोठ्या आवाजात म्हणाली, "ठेव तुझी पाखरं स्वतःजवळच! मेकॉंग नदीपाशी पाखरं विकणारा आणखी एक माणूस माहीत आहे मला."

अरीने म्हातारीकडे पाठ फिरवली. असं करण्यात थोडी जोखीम होती पण बाजारातून भात विकत घेताना भाव कमी करण्यासाठी तिची आई नेहमी अशीच चलाखी करायची.

अरी दोन-तीन पावलं पुढे गेली तोच मागून म्हातारी ओरडली. "कर बाई तुझ्या मनासारखं! पिंजऱ्यातलं कोणतंही पाखरू घे. पण एक लक्षात ठेव, कोपऱ्यातलं पाखरू आजारी आहे. त्याला हात लावलास तर ते मरून जाईल."

अरीने म्हातारीच्या हातावर पैसे टेकवले. तिने पिंजऱ्यात हात घातला आणि कोपऱ्यातल्या पाखराला पकडलं. घाबरलेलं पाखरू जागच्या जागी थिजून राहिलं. अरीने त्याला हळुवारपणे थोपटलं.

पाखराच्या इवल्याशा हृदयाचे ठोके अरीला स्पष्टपणे जाणवले. तिने त्याचा हलकेच मुका घेतला. अरीने मोठा श्वास घेतला आणि हात उंचावले. तिने बोटं उलगडली आणि पाखरावरची पकड सैल केली. एक क्षण पाखराने काहीच हालचाल केली नाही. आणि मग त्याने पंख पसरले आणि पाखरू उडून गेलं.



हळूहळू श्वास सोडत अरी मनातल्या मनात तिच्या इच्छा मागू लागली. “माझ्या कुटुंबाला पुरेसं अन्न आणि नवीन कपडे मिळू देत. दादाला नोकरी लागू दे…”

अरीचा श्वास आता संपत आला होता.

“मी आशा करते की पोलीस परत आम्हाला उगाच त्रास देणार नाहीत. आजोबांसाठी नवीन औषध आणता येईल…”

श्वास संपत आला तसं अरीला अचानक जाणवलं की तिने स्वताःसाठी काहीच मागितलं नाही. कशीबशी ती शेवटचे दोन शब्द पुटपुटली, “अधिक ज्ञान”. अरीने खूप वर्षांपासून शाळेत जायचं स्वप्न पाहिलं होतं. त्यानंतर तिला विद्यापीठातही जायचं होतं.

पाखरू आकाशात घिरट्या घालू लागलं.

म्हातारीने त्याच्याकडे पाहून नाक मुरडलं. अरी जोरजोरात हसू लागली. वर-खाली उड्या मारू लागली. “जा पाखरा. सोनेरी हवेच्या, हिरव्यागार कुरणांच्या उबदार प्रदेशात जा. माझ्या इच्छांना पंखांवर घेऊन दूर उडून जा!”

चिमुकला पक्षी आकाशात दूरवर उडत गेला आणि अखेर दिसेनासा झाला. पूर्वेकडे क्षितिजावर सूर्याचा तेजस्वी गोळा वर येत होता. अरीच्या इच्छा पुऱ्या होतील याची तिला पूर्ण खात्री होती. त्यांचे स्वरूप कसे असेल हे मात्र तिला ठाऊक नव्हते.